माण देशी फौंडेशन

# बाल संरक्षण धोरण

सप्टेंबर 2018

*वर्जन (आवृत्ती) नियंत्रण*

वर्जन 1.0

| वर्जन | सुरू होण्याची दिनांक | यांच्या कडून मंजूर आणि दिनांक | बदलाचे वर्णन |
|---|---|---|---|
| वी-1.0 | सप्टेंबर, 2018 | ऑगस्ट 2018 मध्ये झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेत मंजूरी | लागू नाही |

# अनुक्रमणिका

परिचय....................................................................................................................... 1
1.प्रयोजनाचे निवेदन ...........................................................**Error! Bookmark not defined.**
2.अटींचे स्पष्टीकरण .................................................**Error! Bookmark not defined.**
3. बाल संरक्षण धोरण लागू होणे ......................................................................................... 2
4.बाल संरक्षणाशी संबंधित मूलभूत मूल्ये.......................................**Error! Bookmark not defined.**
5.बाल संरक्षण धोरणातील महत्वाची तत्वे....................................**Error! Bookmark not defined.**
6.अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक गोष्टी ........................................**Error! Bookmark not defined.**
7.कर्मचारी प्रशिक्षण.................................................**Error! Bookmark not defined.**
8.धोरणाचे उल्लंघन. ...........................................................................................5

अ (जोडपत्र) आचारसंहिता.......................................................................................6
बांधिलकीचा जाहीरनामा ............................................................... .............7

# बाल संरक्षण धोरण

## परिचय

माण देशी फौंडेशन , ग्रामीण भागातील स्त्री व्यावसायिकांना ज्ञान, कौशल्ये, मुद्दलाची उपलब्धता आणि पाठिंबा देऊन, त्यांच्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यावर नियंत्रण मिळवून सक्षम बनविण्यासाठी कार्यरत आहे. स्त्रियांना, आर्थिक व्यवहार करण्यास मान्यता आणि त्यावर नियंत्रण मिळवून देण्यापासून या मॉडेलची सुरूवात होते आणि त्यानंतर पुढे स्त्रियांना त्यांची प्रगती करण्यासाठी आवश्यक अश्या गोष्टींबद्दलचे कार्यक्रम घडवून आणले जातात. माण देशी फौंडेशन च्या वित्तिय आणि डिजिटल साक्षरता कार्यक्रमाद्वारे सहभागी स्त्रियांना बँकिंग आणि वित्तिय व्यवस्थापनातील महत्वाच्या गोष्टींची ओळख करून दिली जाते. माण देशी चा उद्योजकता विकास कार्यक्रम, स्त्रियांना त्यांचा व्यवसाय स्थापन करण्यात आणि त्यांची उद्योजक कौशल्ये विकसित करण्यात मदत करतो. स्त्रिया आणि लहान मुलींबद्दलचा कार्यक्रम कमी शिकलेल्या आणि सर्वात जास्त संवेदनशील असलेल्या मुली आणि तरूण स्त्रियांना लक्षात घेऊन बनविलेला आहे. या कार्यक्रमात, जीवनावश्यक कौशल्ये आणि आरोग्य वर्कशॉप्स (कार्यशाळा), वित्तिय साक्षरता आणि उदरनिर्वाह प्रशिक्षण अश्या गोष्टी एकत्रित करून शिकविल्या जातात. मुलींसाठी सायकल कार्यक्रमात, मुलींना सायकल वाटल्या जातात जेणेकरून त्यांचा येण्या-जाण्यात खर्च होणारा वेळ वाचेल आणि दूस-या गावात शाळा असेल, तरी त्यांना शाळेत जाता येईल. माण देशी चँपियन्स मध्ये, संभाव्य उत्कृष्ट खेळाडू ओळखून त्यांना उत्तम क्रीडा सुविधा प्रदान केल्या जातात आणि त्यांचा शारीरीक, मानसिक आणि सामाजिक विकास घडवून त्यांची सर्वांगिण प्रगती केली जाते.

## दृष्टी

महिलांना स्वतः निर्णय व निवड करण्याचा आत्मविश्वास देणे .ज्यामुळेएत्यांना समानता व सन्मानता याचा आनंद घेता येईल .

## हेतू

यशस्वी उद्योजिका होण्याकरिता, महिलांच्यात आत्मविश्वास, धाडस आणि नेतृत्व निर्माण करणे. जेणेकरून, त्यांना स्वतःच्या आयुष्यावर ताबा मिळविता येईल.

## 1. प्रयोजनाचे निवेदन

या कार्यक्रमात सहभागी होणा-या मुलांना आदराने वागविले जाण्यास आणि त्यांच्या हक्कांचे जतन करण्यास माण देशी फौंडेशन बांधिल आहे. या कार्यक्रमाद्वारे ज्या मुलांपर्यंत पोहोचता येईल, त्या मुलांचे कोणत्याही प्रकारची हानी, छळ, दुर्लक्ष आणि शोषणापासून संरक्षण करण्याचे माण देशी फौंडेशन चे ध्येय या धोरणाद्वारे स्पष्ट केले आहे.

## 2. अटींचे स्पष्टीकरण

**मूल :** यूएन कन्वेंशन ऑन द राइट्स ऑफ द चाइल्ड, सप्टेंबर 1990 च्या आर्टीकल (लेख) 1 च्या अनुसार, 18 वर्षांपेक्षा कमी वयाची कोणतीही व्यक्ती मूल समजली जाते.

**कर्मचारी :** कर्मचारी म्हणजे अशी कोणतीही व्यक्ती जी पूर्णवेळ किंवा थोडा वेळ, माण देशी फौंडेशन मध्ये किंवा त्यांच्यासाठी काम करते. यात तात्पुरते आणि कायमस्वरूपी कर्मचारी, इंटर्न्स(तेथेच काम करताना शिकणारे), सल्लागार आणि विश्वस्त मंडळ यांचा समावेश होतो.

**स्वयंसेवक :** पैसे न घेता, माण देशी फौंडेशन साठी नियमितपणे किंवा कधी-कधी काम करणा-या कोणत्याही व्यक्तीला स्वयंसेवक म्हणून संबोधले जाते.

विजिटर्स (पाहुणे) **:** कार्यक्रमाला येणा-या अश्या व्यक्ती ज्या मुलांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या संबंधित असतात.

बाल शोषण  यात "सर्व प्रकारची शारीरिक आणि/किंवा भावनिक वाईट वर्तणुक, लैंगिक शोषण, दुर्लक्ष करणे किंवा दुर्लक्षित वर्तणुक देणे किंवा व्यावसायिक किंवा इतर पिळवणूक, ज्याचा परिणाम म्हणून मुलांचे आरोग्य, अस्तित्व, वाढ किंवा प्रतिष्ठा यांना, नातेसंबंधातील जबाबदारपणा, विश्वास किंवा काही करण्याची ताकद यांच्या संदर्भात प्रत्यक्ष किंवा संभाव्य हानी पोहोचेल" याचा समावेश होतो (डब्लूएचओ रिपोर्ट ऑफ द कन्सल्टेशन ऑन चाइल्ड अब्युज प्रिवेंशन, 1999).

**वरील संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो**

**शारीरिक शोषण / छळ** – अशी कोणतीही कृती ज्याने त्या मुलाला/ मुलीला शारीरिक इजा पोहोचेल. यात पुढील गोष्टींचा तर समावेश होतोच, त्याचबरोबर इतरही अनेक गोष्टी असू शकतात : जखमा करणे, कापणे, मारणे, चावणे, भाजणे, ओरखडे ओढणे, गळा दाबणे, गुदमरणे, बुडवणे, विषप्रयोग करणे इत्यादी.

**लैंगिक शोषण / छळ** – अशी कोणतीही कृती ज्यात, काय होत आहे ते मुलांना समजत असताना किंवा नसताना, मुलांना बळजबरीने किंवा भुलवून लैंगिक कृतींमध्ये सहभागी करून घेतले जाते त्याला लैंगिक शोषण म्हणतात. लैंगिक शोषणामध्ये पुढील प्रमाणेच इतर अनेक गोष्टींचा समावेश होतो :

- स्पर्श करून केलेले शोषण : ओरल सेक्स, गुद्द्वार किंवा गुप्तांग यांच्यात प्रवेश करून किंवा प्रत्यक्ष प्रवेश न करता केलेला संपर्क, असे वाईट कृत्य करणा-या व्यक्तीबरोबर किंवा इतर कोणाबरोबर असे करण्यास मुलांना प्रोत्साहन देणे, अश्लील चित्रण किंवा वेश्याव्यवसायाच्या हेतूने केलेल्या कामांमध्ये मुलांना गुंतवणे.

- स्पर्श न करता केलेले शोषण : अश्लील किंवा लैंगिक चित्रे दाखवणे, चुकीच्या अवस्थेत काढलेले फोटो किंवा लैंगिक चित्रण किंवा त्या अनुरोधाने वागणे किंवा बोलणे.

**भावनिक शोषण / छळ** – एखादी कृती केल्याने किंवा वगळले जाण्याने जर मुलांच्या मानसिक, सामाजिक, बौद्धिक आणि भावनिक वर्तनावर किंवा प्रगतीवर विपरित परिणाम होत असेल तर त्याला भावनिक शोषण म्हणतात. यात पुढील गोष्टींचा समावेश होऊ शकतो :

- मुलांना एकटे टाकणे, कमी लेखणे, सतत टीका करणे किंवा इतरांशी नकारात्मक तुलना करणे, इतरांपासून वेगळे करणे, भ्रष्ट करणे, शोषण करणे किंवा दहशत घालणे या गोष्टींना देखिल भावनिक शोषण समजले जाते.

**दुर्लक्ष** – मुलांची योग्य काळजी न घेणे  म्हणजे दुर्लक्ष. यात शारीरिक, भावनिक, वैद्यकीय, पर्यवेक्षी आणि शैक्षणिक दुर्लक्षांचा समावेश होतो.

## 3. बाल संरक्षण धोरण लागू होणे

माण देशी फौंडेशन च्या, एक संस्था म्हणून, मुलांना सुरक्षित ठेवणे आणि सर्व प्रकारच्या हानी तसेच शोषणापासून त्यांचे संरक्षण करण्याच्या वचनबद्धतेची पुष्टी करून त्याला हे धोरण बळकटी देते.

धोरण पुढील सर्वांना लागू आहे :

- सर्व कर्मचारी
- मुलांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कात येणारे सर्व स्वयंसेवक
- सर्व विजिटर्स (पाहुणे)

## 4. बाल संरक्षणाशी संबंधित मूलभूत मूल्ये

- मुलांना आदराने आणि सन्मानाने वागवावे.
- वय, लिंग, भाषा, समाजातील स्थान, जात, धर्म किंवा इतर वैयक्तिक गुणधर्म काहीही असले तरी, सर्व मुलांना समानतेने वागवावे.
- सर्व प्रकारच्या हानी आणि शोषणापासून मुलांचे संरक्षण झाले पाहिजे.

## 5. बाल संरक्षण धोरणातील महत्वाची तत्वे

- मुलांच्या हक्कांचा सदैव आदर करावा आणि माण देशी फौंडेशन शी संबंधित प्रत्येक व्यक्तीने नेहमीच मुलांच्या हिताच्या दृष्टीनेच सर्व प्रयत्न करावेत.
- कोणत्याही प्रकारचे शोषण कधीही सहन केले जाणार नाही आणि बाल संरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी लागणा-या सर्व गोष्टी केल्या जातील.
- मुलांना सुरक्षित वाटून त्यांच्या सामर्थ्याचा पूर्ण वापर करता यावा यासाठी, सर्व कामे पारदर्शक रीतीने आणि मोकळेपणाने व्हावीत असे माण देशी फौंडेशन चे मत आहे. तसे केल्याने कर्मचारी, समाज, मुले, स्वयंसेवक आणि पाहुणे या सर्वांना त्यांची मते मोकळेपणाने मांडता येतात.
- बाल संरक्षण धोरण यशस्वी रीतीने लागू होण्यासाठी, माण देशी फौंडेशन शी संबंधित सर्वांनी व्यक्तिगत तसेच सर्वांच्या सोबतीने जबाबदारी घेण्याची गरज आहे.

## 6. अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक गोष्टी

कर्मचारी : विश्वस्त मंडळ, स्वयंसेवक तसेच पाहुणे यांच्यासह सर्व कर्मचा-यांनी बाल संरक्षण धोरणाशी बांधिलकी असल्याच्या निवेदनावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मुलांबरोबर काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे वेळोवेळी पर्यवेक्षण करावे आणि त्यांना बाल संरक्षणाशी संबंधित समस्या या विषयावर आधारीत चर्चेमध्ये सहभागी होण्याची संधी द्यावी – उदाहरणार्थ त्या विषयांवरील सभा किंवा अनौपचारिक चर्चा इत्यादी.

पाहुणे आणि स्वयंसेवक : मुलांच्या संपर्कात येणा-या सर्व पाहुण्यांनी आणि स्वयंसेवकांनी, बाल संरक्षण धोरणाशी बांधिलकी असल्याच्या निवेदनावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. भेटीदरम्यान किंवा कार्यक्रमांदरम्यान सर्व पाहुणे आणि स्वयंसेवक यांना योग्य प्रकारे माहिती देण्याचे आणि त्यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारी कर्मचा-यांची आहे. तसेच त्यांनी बाल संरक्षण धोरणावर स्वाक्षरी केली आहे याची खात्री देखिल कर्मचा-यांनी करून घ्यावी. काहीतरी योग्य कारण असल्याशिवाय पाहुणे किंवा स्वयंसेवकांना कधीही मुलांबरोबर एकटे सोडू नये, कर्मचा-यांनी सतत त्यांच्याबरोबर असले पाहिजे.

भरती झालेल्या व्यक्तींनी धोरण समजून घेणे : मुलांबरोबर काम करण्यासाठी भरती केल्या गेलेल्या कर्मचा-यांना बाल संरक्षण धोरणाबद्दल तसेच मुलांच्या संपर्कात असताना कसे वागावे याबद्दल प्रशिक्षण दिले जाईल. आमच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणा-या सर्व प्रौढ व्यक्तींनी, मुलांबरोबर योग्य प्रकारे कसे वागावे याबद्दलचे मार्गदर्शन आचारसंहिता (जोडपत्र A) मध्ये दिलेले आहे.

कार्यक्रमाचा आराखडा : कार्यक्रमाचे आयोजन करताना, माण देशी फौंडेशन आणि त्यांचे कर्मचारी मुलांच्या संरक्षणाच्या बाबतीतले सर्व धोके लक्षात ठेवून ते टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील आणि त्याच अनुसार व्यासपीठावर कार्यक्रम आयोजित करतील. सर्व कार्यक्रमांच्या दरम्यान नियमितपणे बाल संरक्षणाचे पुनरावलोकन केले गेले पाहिजे आणि पूर्वीच्या अनुभवावरून शिकलेल्या गोष्टींचा वापर पुढील कार्यक्रम आयोजित करताना केला गेला पाहिजे किंवा त्यासाठी आवश्यक त्या तडजोडी केल्या गेल्या पाहिजेत.

मुलांशी संबंधित संप्रेषण : माण देशी फौंडेशन च्या वेबसाइट किंवा प्रकाशनातील माहितीमध्ये, मुलांशी संबंधित, खळबळजनक लिखाण किंवा अवमानजनक भाषा किंवा मुलांची अपु-या कपड्यांमधली किंवा चूकीच्या स्थितीतली चित्रे अश्या गोष्टी नसतील. पालकांच्या परवानगीशिवाय मुलांचे फोटो किंवा व्हिडिओज् काढले जाणार नाहीत याची खबरदारी माण देशी फौंडेशन  तर्फे घेतली जाईल. या खबरदारीमध्ये ते फोटोज किंवा मेसेजेस कसे वापरले जातील याची माहिती मुलांना तसेच पालकांना देखिल देण्याचा समावेश होतो.

## 7. कर्मचारी प्रशिक्षण

- धोरण लागू केल्यापासून 60 दिवसांच्या आत, मुलांबरोबर काम करणा-या सर्व कर्मचा-यांना बाल संरक्षण धोरण आणि पद्धतींबद्दल अभिमुख केले जाईल (माहिती दिली जाईल).
- मुलांबरोबर काम करण्यासाठी नव्याने नियुक्त केल्या गेलेल्या कर्मचा-यांना नियुक्तीपासून 30 दिवसांच्या आत बाल संरक्षणाबद्दल अभिमुख केले जाईल.
- मुलांबरोबर काम करणा-या कर्मचा-यांना धोरणाबद्दल वर्षातून एकदा रिफ्रेशर प्रशिक्षण दिले जाईल.
- पाहुणे आणि स्वयंसेवकांना, मुलांच्या संपर्कात येण्याआधी कर्मचा-यांकडून धोरणाबद्दल थोडक्यात अभिमुख केले जाईल.
- बाल संरक्षण धोरणाबद्दल अभिमुख करताना, बाल संरक्षण, तसेच मुलांबरोबर कसे वागावे आणि कसे संभाषण करावे यांबद्दलचे नियम समजावण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले गेले पाहिजे.
- धोरणाबद्दल अभिमुख केले जात असताना आणि एखाद्या कामाबद्दलच्या जबाबदा-यांशी संबंधित इतर एखादे प्रशिक्षण दिले जात असताना, सर्व प्रौढ व्यक्तींनी त्यांच्या कडून काय काम अपेक्षित आहे याबद्दल काही शंका असल्यास त्यांचे निराकरण करून घ्यावे.

### प्रशिक्षणाच्या जबाबदा-या :

- इतर कर्मचा-यांना, बाल संरक्षण धोरणाबद्दल प्रशिक्षण देण्याची जबाबदारी, शाखा समन्वयक, कार्यक्रम प्रमुख आणि एचआर कर्मचारी यांची असेल.
- दिलेली सर्व प्रशिक्षणे/घेतलेल्या सर्व मार्गदर्शक सभा यांची तारीख आणि सहभाग्यांच्या सूचीसह माहितीची नोंद एचआर फाइल्स मध्ये असली पाहिजे.
- कोणत्या प्रकारचे काम करायचे आहे त्यानुसार, कर्मचा-यांची भूमिका तसेच त्यांची पार्श्वभूमी आणि अनुभव, यांच्यावर आधारित मुलांच्या संगोपन, सुरक्षितता यांबद्दल अतिरिक्त विशेषज्ञ प्रशिक्षण देण्यात येईल.
- प्रशिक्षण किंवा पर्यवेक्षण यांद्वारे औपचारिक किंवा टीम मिटिंग्ज (गट सभांच्या) वेळेला अनौपचारिक पद्धतीने कर्मचारी आणि स्वयंसेवकांना मुलांच्या सुरक्षेसंबंधात नियमितपणे अद्यावत माहिती मिळत रहाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

## 8. धोरणाचे उल्लंघन

आचारसंहिता : विश्वस्त मंडळासह, माण देशी फौंडेशन चे सर्व कर्मचारी, स्वयंसेवक आणि पाहुणे यांनी आचारसंहितेवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. आचारसंहितेचा भंग होईल असे कोणत्याही प्रकारचे वर्तन आढळून आल्यास त्याची माहिती दिली पाहिजे. आचारसंहितेमध्ये नमूद न केलेल्या एखाद्या परिस्थितीमध्ये, मुलांचे हित लक्षात घेऊन कर्मचा-यांनी स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून निर्णय घ्यावेत अशी माण देशी फौंडेशन ची अपेक्षा असेल.

अहवाल देणे : माण देशी फौंडेशन आणि त्यांचे कर्मचारी, मुलांचे कोणत्याही प्रकारचे शोषण सहन करणार नाहीत आणि बाल संरक्षण धोरणाचे पालन होईल अश्या पद्धतीने कोणतेही उपाय योजताना कचरणार नाहीत. बाल संरक्षण धोरणाचे उल्लंघन झाल्यास किंवा तशी शंका आल्यास, त्वरीत संबंधित वरीष्ठांना सूचित करण्यात यावे.

कारवाई : काही तक्रार आल्यास, निरीक्षकांनी त्वरित त्या बालकाला सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करून, घटनेची चौकशी करावी. घटनेबद्दल तक्रार येताच, त्याने/तीने 24 तासांच्या आत स्वतःचा अहवाल, मुख्य प्रशासकीय अधिकारी (सीएओ) यांच्याकडे सादर करावा. त्या अहवालाचे पुनरावलोकन करून, सीएओ ने लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा, 2012, भारतीय दंड संहिता तसेच लागू असलेले इतर कायदे यांच्या अंतर्गत नमूद केलेली कारवाई करावी. अशी तक्रार कोणतेही कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी इतर कर्मचा-यांविरूद्ध किंवा स्वयंसेवक आणि भागीदारांविरूद्ध केली, तर चौकशी करावी आणि चौकशीदरम्यान ती तक्रार खोटी आढळली किंवा घटनेमागे कोणताही वाईट हेतू आढळून आला नाही, तरी तक्रार करणा-या व्यक्तीविरूद्ध कोणत्याही प्रकारची कारवाई केली जाऊ नये.

गोपनीयता : बाल शोषणाविरूद्ध चिंता आणि तक्रारी कर्मचारी, स्वयंसेवक, मुले आणि समाजातील व्यक्ती इत्यादी अनेकांकडून नोंदविल्या जाऊ शकतात. अश्या प्रकारच्या सर्व नोंदींचा गांभिर्याने विचार केला गेला पाहिजे. जेव्हा अशी चिंता व्यक्त केली जाते किंवा अहवाल नोंदवला जातो तेव्हा तक्रार करणारी व्यक्ती आणि त्यात समावेश असलेली मुले किंवा प्रौढ व्यक्ती यांच्याबद्दल गोपनीयता बाळगली गेली पाहिजे. त्या माहितीची अत्यंत आवश्यकता असल्याशिवाय, कोणालाही त्याबद्दल कळू देऊ नये.

मी हे करेन :

- वय, लिंग, भाषा, धर्म, समाजातील स्थान, जात किंवा इतर वैयक्तिक गुणधर्म काहीही असले तरी, सर्व मुलांना आदराने आणि समानतेने वागवेन.
- मुलांचे पर्यवेक्षण करताना आणि/ किंवा त्यांच्याशी संवाद साधताना अहिंसक आणि सकारात्मक वर्तन ठेवेन.
- मुलांबरोबर असताना अयोग्य, त्रासदायक, अपमानास्पद, लैंगिक उत्तेजनाकारक, कमी लेखणारे किंवा असंस्कृतपणाचे वर्तन करणार नाही किंवा तशी भाषा वापरणार नाही.
- मुलांबरोबर काम करताना, स्वतःला तडजोडीच्या, शंकास्पद किंवा संवेदनशील परिस्थितीत अडकू देणार नाही.
- फोटो काढण्यापूर्वी, मुलांचे फोटो किंवा गोष्ट रेकॉर्ड करण्यापूर्वी किंवा वापरण्यापूर्वी त्या मुलांची आणि/ किंवा त्याच्या/ तिच्या पालकांची परवानगी घेईन.
- माण देशी फौंडेशन च्या व्यवस्थापनाची पूर्वपरवानगी न घेता, माझ्या व्हॉट्सअप किंवा फेसबुक किंवा इतर कोणत्याही सोशल मिडिया अकाउंट वर मुलांचे फोटो किंवा व्हिडिओ वापरणे टाळेन.

मी हे कधीही करणार नाही :

- मुलांना असमानतेने किंवा अन्यायाने वागविणे उदाहरणार्थ - पक्षपातीपणा करणे आणि इतरांना वगळणे.
- मुलांना शारीरिक इजा करणे किंवा मारणे किंवा मुलांना बौद्धिक आणि मानसिक रित्या त्रास होईल अशी भाषा वापरणे.
- मुलांबरोबर असताना धूम्रपान करणे किंवा अंमली पदार्थ किंवा मद्याच्या नशेत असणे.
- मुलांना अश्लील साहित्य दाखविणे किंवा देणे.
- मुलांबरोबर कोणत्याही प्रकारचे लैंगिक वर्तन करणे किंवा मुलांना चूकीच्या पद्धतीने स्पर्श करणे किंवा तश्या प्रकारची भाषा वापरणे.
- मुलांचे निर्वस्त्र अवस्थेत किंवा अपु-या कपड्यांमध्ये फोटो काढणे.
- सामान्य व्यावसायिक मर्यादेच्या पलिकडे जाऊन मुलांशी संबंध वाढविणे.
- एखाद्या विशिष्ट प्रकल्पात गरज असल्याशिवाय आणि माण देशी फौंडेशन च्या व्यवस्थापनाकडून विशेष परवानगी मिळाल्या व्यतिरिक्त इतर वेळेस सोशल नेटवर्क द्वारे मुलांच्या संपर्कात रहाणे.
- मुलांबरोबर बेकायदेशीर, असुरक्षित किंवा अपमानजनक वर्तनात सहभागी होणे किंवा तसे करण्यास सूट देणे.
- बाल संरक्षण धोरणाचे उल्लंघन, त्याच्याशी संबंधित चिंता यांच्या कडे दुर्लक्ष करणे किंवा त्याचा अहवाल न देणे.

**बांधिलकीचा जाहीरनामा**

मी, खाली स्वाक्षरी केलेली व्यक्ती, ______________________________ असे घोषित करत आहे की, मी माण देशी फौंडेशन चे बाल संरक्षण धोरण वाचले आणि नीट समजून घेतले आहे आणि त्याच्या अनुसार काम करण्यास मी बांधिल आणि तयार आहे.

आचारसंहिता आणि बाल संरक्षण धोरण यांचे पालन करण्यात अपयशी ठरल्यास, माण देशी फौंडेशन बरोबरचे माझे संबंध तोडले जाऊ शकतात किंवा त्यासंबंधात माझ्यावर शिस्तभंगाची किंवा कायदेशीर कारवाई होऊ शकते याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी ______________________

नाव ____________________________

दिनांक ______________________________

स्थळ _______________________